फौजदारी किरकोळ अर्ज क्र. 64/2015
सोनाली केवडकर वगैरे वि. भागवत केवडकर वगैरे

## आदेश नि.क्र. 13 वर

प्रस्तुत प्रकरण महिलांचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा मधील तरतुदींनुसार दाखल करण्यात आले आहे. अर्जदार क्र. 2 यांच्या अर्जदार क्र. 1 या आई आहेत. गैरअर्जदार क्र. 1 हे अर्जदार क्र. 1 यांचे पती असून अर्जदार क्र. 2 यांचे वडील आहेत. गैरअर्जदार क्र. 2 व 3 आणि 4 अर्जदार क्र. 1 यांचे अनुक्रमे दिर, जाऊ व सासु आहेत.

2. सासरी छळ होत असल्यामुळे अर्जदार क्र. 1 व 2 हे माहेरी राहत आहेत. अर्जदार क्र. 1 व 2 हे त्यांचा चरितार्थ करण्यास असमर्थ आहेत. गैरअर्जदार क्र. 1 हे खाजगी नोकरी करतात. गैरअर्जदार क्र. 2 व 3 हे शिक्षक आहेत. तर गैरअर्जदार क्र. 1, 2 व 4 यांचे नावावर वडिलोपार्जीत शेतजमीनी आहेत. त्यामध्ये अर्जदार क्र. 1 व 2 यांचा हिस्सा आहे. अर्जदार यांच्या दैनंदिन चरितार्थासाठी त्यांना गैरअर्जदार यांचेकडून एकूण दरमहा 7,000/— दरम्यानची पोटगी मिळावी याकरिता हा अर्ज देण्यात आलेला आहे.

3. त्यावर गैरअर्जदार यांनी त्यांचे सविस्तर म्हणणे दिलेले आहे. गैरअर्जदार यांचे दरम्यान अगोदरच वाटप झालेले आहे. घटस्फोटासाठीचे प्रकरणामध्ये अर्जदार यांना दरमहा 2,000/— रूपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश झालेला आहे. अर्जदार या व्यभिचारी आहेत. त्या स्वतःहून माहेरी राहत आहेत. यापूर्वी संरक्षण अधिकारी यांनी अर्जदार यांचे तर्फे फौजदारी किरकोळ अर्ज 33/2015 दाखल केला होता. तो अर्ज काढून घेण्यात आलेला आहे. या प्रकरणामध्ये कौटुंबिक घटना अहवाल दाखल नाही. त्यामुळे केवळ त्रास देण्यासाठी व पैसे मिळवण्यासाठी अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केलेला आहे. तो नामंजूर करण्यात यावा असे गैरअर्जदार यांनी नमूद केलेले आहे.

4. यापूर्वी गैरअर्जदार क्र. 1 यांनी घटस्फोटासाठी अर्ज लातुर येथील

न्यायालयात दाखल केलेला होता. त्यामध्ये अंतरिम पोटगी मंजूर करण्यात आली होती. परंतू तो अर्ज न्यायालयाने नामंजूर केलेला आहे. तसेच त्यामध्ये गैरअर्जदार यांनी कोणतीही रक्कम जमा केलेली नाही असे मला अर्जदार यांचे वकील श्री. आर.व्ही. गायकवाड यांनी सांगितले.

5. अर्जदार सोनाली व गैरअर्जदार क्र. 1 भागवत यांचे दरम्यान पतीपत्नीचे नाते कायम आहे. अर्जदार क्र. 2 श्रेयस हा त्यांचा मुलगा आहे. पती या नात्याने अर्जदार क्र. 1 व 2 यांचा सांभाळ करण्याचे जबाबदारी गैरअर्जदार क्र. 1 यांची आहे. अर्जदार या विनाकारण माहेरी राहत आहेत तसेच त्यांचे चारित्र्य चांगले नाही ही बाब अद्याप सिध्द झालेली नाही. त्यामुळे त्याबाबत आताच कोणताही निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

6. गैरअर्जदार क्र. 1 हे आडत दुकानामध्ये काम करत आहेत. त्यांना वार्षिक 2,50,000/– रूपये उत्पन्न मिळते. तसेच त्यांचे नावावर वडिलोपार्जीत शेतजमिनी आहेत. अर्जदार या त्यांचा चरितार्थ करण्यास असमर्थ आहेत असे अर्जदार यांनी शपथेवर नमूद केलेले आहे. तसेच सदर जमिनींचे 7/12 चे उतारे प्रकरणात दाखल केलेले आहेत.

7. या प्रकरणाचा अंतिम निर्णय होण्यास बराच कालावधी लागेल. तोपर्यंत अर्जदार यांना त्यांच्या चरितार्थासाठी दरम्यानची पोटगी गैरअर्जदार क्र. 1 यांनी द्यावी असा आदेश देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. अर्जदार क्र. 2 हे अज्ञान आहेत. सध्याची वाढती महागाई, प्रकरणातील पक्षकार यांचे राहणीमान, गैरअर्जदार क्र. 1 यांचे उत्पन्न वगैरे बाबींचा विचार करता अर्जदार यांनी मागितलेली रक्कम ही अवास्तव वाटते. प्रकरणामध्ये योग्य न्याय होणेसाठी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

1. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

2. प्रस्तुत अर्ज नि.क्र. 13 दाखल तारखेपासून या प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत गैरअर्जदार क्र. 1 यांनी अर्जदार क्र. 1 व 2 यांना प्रत्येकी अनुक्रमे दरमहा रक्कम रूपये 2,000/– व 1,500/– असे एकूण दरमहा रूपये 3,500/– अंतरिम पोटगी म्हणून द्यावेत.

**दिनांक 12.12.2017**

**( श्रीकृष्ण ह. इनामदार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रेणापूर**